PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/ 28 / of 2023**

## परिपत्रक:

**विषय: राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांसंदर्भात प्राचार्यासमवेत आढावा बैठकीचे.**

संदर्भ:—विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल पत्र क्र. विससं/उशि/कोविप/मवि/राष्ट्रीय शैक्षणिक धोरण/२०२३/२३१६ दिनांक १५ सप्टेंबर, २०२३.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अधिनस्त **अशासकीय अनुदानीत** कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जिल्हा ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे अनुदान निर्धारण, कार्यालयीन कामकाजामध्ये ई—ऑफिस प्रणालीचा वापर, शिष्यवृत्ती, नॅक मूल्यांकन पुर्नमुल्यांकन तसेच महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन करून घेण्याच्या अनुषंगाने परिसस्पर्श योजनेची अंमलबजावणी, करिअर कटट्या अंतर्गत विविध उपक्रम व आर्थिक साक्षरता अभियान इत्यादी विषयांबाबत आढावा घेण्यासाठी **रूम नं. २८, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई येथे** दिनांक **४ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११.००** वाजता सर्व महाविद्यालयीन प्राचार्यासमवेत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, सदर बैठकीस उपस्थित रहावे.

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण मुंबई—४०० ०३२
दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत अधिनस्त अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जिल्हा ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग महाविद्यालयांचे प्राचार्य.